Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
**416 004, MAHARASHTRA**
PHONE:EPABX–2609000,www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र**
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ - २६०९०९१, २६०९१३५

जा.क्र. शिवाजी वि/संलग्नता टी-२/परिपत्रक/ No - 134 दि. 06 MAY 2025

# :: अतितात्काळ परिपत्रक ::

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये / संस्था,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय:- सन २०२५-२६ करिता संलग्नीकरणासाठी पाठविण्यात येणाऱ्या समितीवर ICT च्या माध्यमातून प्रक्रिया राबवणेसाठी सुधारीत प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' ऑनलाईन भरणेबाबत...**

**महादोय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षा पासून संलग्नीकरणासाठी प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाचे नमुनेबाबत ICT च्या माध्यमातुन प्रक्रिया राबविणेसाठीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. यानुसार सदर स्थानिक चौकशी समिती अहवाल ऑनलाईन सादर करण्याकरिता महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांचे संलग्नीकरणाचे नुतनीकरण व नैसर्गिक विस्तार याबाबतचे सुधारीत प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' भरणेसाठीची लिंक **दि.०६.०५.२०२५ पासून दि.१३.०५.२०२५ पर्यन्त** ओपन करण्यात आली आहे.

सबब, सन २०२५-२६ करिता आपल्या महाविद्यालयांचे संलग्नीकरणाचे नुतनीकरण व नैसर्गिक विस्तार बाबतच्या प्रपत्र 'अ', 'ब' व विद्याशाखानिहाय 'क' प्रस्तावांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणेत यावी. जेणेकरुन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासूनच्या संलग्नीकरणाचे पत्र मिळणेस विलंब होणार नाही. अन्यथा ज्या महाविद्यालयांच्या प्रपत्र बाबतची माहिती विद्यापीठास ऑनलाईन पध्दतीने वेळेत येणार नाही त्या महाविद्यालयाच्या नुकसानीस सर्वस्वी संबंधीत महाविद्यालय जबाबदार राहिल. याची कृपया नोंद घ्यावी.

**कळावे,**

आपला विश्वासू,

डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

टिप:-

१. **सुधारीत प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' बाबतची माहिती व सोबत ऑनलाईन पध्दतीने जोडण्यात येणारी कागदपत्रे, फोटो व व्हिडीओ दिलेल्या सूचनेनुसार अपलोड करण्यात यावेत. जर माहिती अपूर्ण किंवा चूकीच्या पध्दतीने किंवा तीच-तीच कागदपत्रे सादर केलेली आढळल्यास सर्वस्वी संबंधीत संस्था / महाविद्यालय जबाबदार राहिल.**